2231C


# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

(महाराष्ट्र शासन स्वामित्व कंपनी)

**CIN : 70200MH1998SGC116664**

५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१.

दुरध्वनी क्र. ०२२-०६५९१०८७/२६५९०५८८/२६५९१९८९, फॅक्स क्र. ०२२-२६५९०५८६

**Email ID** : sppl_mumbai@rediffmail.com **Website** : www.sppl.biz


**जा.क्र.** शिपुप्रम/स.व्य.(प्र)/सा.स.व्य./१५५/२०१७ **दिनांक** : ३१ जानेवारी, २०१७.

## कार्यालयातील साफसफाईचे व्यवस्थापन याकरीता निविदा मागविण्याची सुचना

खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून या शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयातील साफसफाई/स्वच्छतेच्या कामाकरीता इच्छुक सेवा पुरवठादाराकडून दि. २३ फेब्रुवारी, २०१७ पर्यंत खाली दिलेल्या अर्जाच्या नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

१. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१ येथे असलेल्या कार्यालयाचे एकूण क्षेत्रफळ साधारणपणे ७३०.४९६६ चौरस मीटर इतके आहे.

२. निविदा विहीत प्रपत्रात व मोहोरबंद लिफाफ्यात भरुन व्यवस्थापक (प्रशासन), शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१ यांच्याकडे दि. २३ फेब्रुवारी, २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करावी.

३. प्राप्त निविदांचे मोहोरबंद लिफाफे त्याच दिवशी म्हणजेच दि. २३ फेब्रुवारी, २०१७ सायं. ४.०० वाजता शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१ येथे उघडण्यात येतील. सदर लिफाफे उघडतेवेळी निविदाधारक स्वत: किंवा त्यांचा एक अधिकृत प्रतिनिधी प्राधिकृत पत्राच्या आधारे-उपस्थित राहू शकतो.

४. मोहोरबंद लिफाफ्यावर **"कार्यालयातील साफसफाई/स्वच्छता कंत्राटकरीता निविदा"** असे लिहिणे आवश्यक आहे.

**सर्वसाधारण अटी व शर्ती :**

१) शिपुप्रम कार्यालयातील साफसफाई/स्वच्छता कामात संपूर्ण कार्यालयाची साफसफाई/स्वच्छता, कार्यालय कार्यालयीन वेळेत नेहमीच स्वच्छ ठेवणे. त्याचप्रमाणे कार्यालयामधील टेबल, खुर्च्या, कपाटे, संगणक, प्रिंटर, एअर कंडीशन, झेरॉक्स मशिन, टेलिफोन यंत्रणा इत्यादींची साफसफाई/स्वच्छता कामांचा समावेश आहे.

२) सुरक्षा अनामत रक्कम रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शिपुप्रमकडे ठेवावी लागेल.

३) कार्यालयातील साफसफाई/स्वच्छता कामाकरीता कंत्राट कालावधी आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक वर्षाकरीता राहील.

४) सदरहु साफसफाई/स्वच्छता कामावर सेवा पुरवठादाराची वैयक्तिक देखरेख राहणे आवश्यक आहे. तसेच शिपुप्रमला आवश्यक त्यावेळी ती सेवा उपलब्ध राहण्याच्या दृष्टीने सेवा पुरवठादाराचे कार्यालय मुंबईतच असणे आवश्यक आहे. मुंबई बाहेर कार्यालय असलेल्या सेवा पुरवठादाराचा साफसफाई/स्वच्छता कामाकरीता विचार केला जाणार नाही.

५) सेवा पुरवठादाराने विहित अर्जात संपूर्ण तपशील न भरल्यास अथवा त्या सोबत अर्जात नमूद केलेल्या कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती जोडलेली नसल्यास तो अर्ज व निविदा रद्द समजण्यात येईल.

६) विहीत करारनामा आठ दिवसाच्या आत करण्यात येईल. त्या करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक राहतील. सेवा पुरवठादारास शिपुप्रम कार्यालयाकडून स्वीकृत करण्यात आलेले दर, दर महिन्याच्या शेवटी अदा करण्यात येईल.

कृ.मा.प.